I/O प्रत.

पोलीस ठाणे सदर बाजार, जालना

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): जालना    **P.S.**(ठाणे): एस बी जालना

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0690    **Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 21/06/2024 21:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
| --- | --- | --- |
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7(अ) |

पोलीस ठाणे अंमलदार पोलीस ठाणे सदर बाजार जालना

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शुक्रवार    **Date From** (दिनांक पासून): 21/06/2024
   **Time Period** (कालावधी): पहर 5    **Date To** ( दिनांक पर्यंत): 21/06/2024
   **Time From** (वेळेपासून): 15:25 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 15:25 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 21/06/2024    **Time** (वेळ): 21:21 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 049

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 21/06/2024 21:21 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): Oral

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पश्चिम, 02 किमी    **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): आहील्याबाई होळकर सामाजीक सभाग

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

.0 Total value (चोरीस गेलेल्या

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सय्यद रहिम सय्यद ईस्माईल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मिलन चौक,मोरंडी मोहल्ला, जुना ,एस बी जालना ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मिलन चौक,मोरंडी मोहल्ला, जुना ,एस बी जालना ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9404040477

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शमसन छबुराव कसबे | | | 1. स्वच्छता निरीक्षक वर्ग3,मनपा, प्लॉट न01 गट न226 चौधरीन,एस बी जालना , जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 21/06/2024

मी सय्यद रहिम सय्यद ईस्माईल वय-34वर्षे धंदा-हॉटेलमालक रा-मिलन चौक,मोरंडी मोहल्ला, जुना जालना मोबाईल क्रमांक - 9404040477

समक्ष सदर बाजार जालना पोलीस ठाणे जालना येथे हजर राहुन फिर्याद देतो की ,मी वरिल ठिकाणी कुटुंबासह राहतो व हॉटेल व्यवसाय करुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

जालना महानगरपालीका हद्दीत भुमापन क्र.8685,मदिना मस्जिद रोड,जालना येथे 645.40 चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड मी खरेदी करुन त्या ठिकाणी दगड विटांचे बांधकाम करुन 20 दुकाने तयार करुन भाडयाने दिली आहेत.सदर बांधकाम विनापरवाना अनाधिकृतपणे करण्यात आले असल्याने ते काढुन टाकण्याची मला नोटीस देण्यात आली आहे.ती नोटीस रद्द करण्यासाठी जालना मनपा,जुना जालना -2 विभाग येथील स्वच्छता निरीक्षक श्री शॅमसन कसबे व श्री शोएब खान जालना मनपा हे लाचमागणी करीत असल्याबाबत तक्रार देण्यासाठी दि. 19/06/2024 रोजी मी छ.संभाजीनगर येथे एसीबी कार्यालयास गेलो तेथे मी मा.पोलीस अधिक्षक यांना तक्रार सांगितली त्यानंतर त्यांनी पोउपअधि श्री साबळे यांना बोलावुन माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास सांगितले.पोउपअधि श्री साबळे यांनी मला लेखी तक्रार देण्यास सांगितले त्याप्रमाणे मी त्यांना माझे हस्ताक्षरात लेखी तक्रार दिली ती पुढीलप्रमाणे,

मी नमुद ठिकाणी राहत असुन हॉटेल व्यवसाय करतो. दि.19/04/2023 रोजी मी जालना महानगरपालीका हद्दीत भुमापन क्र.8685,मदिना मस्जिद रोड,जालना या ठिकाणचे जागेची श्री दौलतसिंग राजपुत व इतर 8 जणांकडुन 645.40चौ.मीटर क्षेत्रफळाचा भुखंड खरेदी केला आहे त्यांचा विक्री करारनामा करण्यात आला असुन विक्री करणार यांनी मला सदर जागेसंबंधी व्यवहार करण्याचे कुलमुखत्यारपत्र तयार करुन दिले आहे.त्या ठिकाणी मी दगड विटांचे बांधकाम करुन 20 दुकाने तयार करुन भाडयाने दिली आहेत.

दि.21/03/2024 रोजी जालना शहर महानगरपालीका ,जालना यांनी आवश्यक परवानगीशिवाय सदर ठिकाणी अनाधिकृत बांधकाम केल्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 53(1) अन्वये मा.आयुक्त,जालना मनपा यांनी नोटीस बजाविली आहे.ती नोटीस श्री शॅमसन कसबे,स्वच्छता निरीक्षक,जुना जालना-2विभाग,जालना ,जालना शहर मनपा यांच्या दि.19/03/2024रोजीच्या अनाधिकृत विकास कामाविषयीचा तपासणी अहवालावरुन पाठविण्यात आली आहे.ती नोटीस खारीज करण्यासाठी मी दि. 10/05/2024 रोजी मा.आयुक्त,मनपा जालना यांना अर्ज दिला आहे.त्याबाबत मी श्री कसबे यांची 16.06.2024 रोजी भेट घेतली असता त्यांनी मला त्यांचे व स्वच्छता निरीक्षक श्री शोएब खान असे दोघांचे मिळुन 10,000रु.ची मागणी केली आहे त्यावेळी त्यांनी माझेकडुन रोख 2000 रु.घेतले आहेत.

जालना महानगरपालीका यांनी दिलेली म.प्रा.नगररचना अधि. 53(1) ची नोटीस खारीज (रद्द) करण्यासाठी 10,000 रु.दयावे लागतील तरच तुमचे काम होईल असे म्हणुन मला स्वच्छता निरीक्षक श्री कसबे यांनी 10,000 रु.लाचेची मागणी केली आहे.

मी दि.20/06/2024 रोजी स्वच्छता निरीक्षक श्री कसबे व श्री शोएब खान यांची भेट घेणार आहे. माझी श्री कसबे व श्री शोएब खान यांना लाच देण्याची इच्छा नाही त्यांचेशी माझा काहीएक पैशाचा देवाण-घेवाणीचा उसनवारीचा व्यवहार नाही तसेच त्यांचेशी माझे काहीही वैर अथवा दुश्मनी नाही.त्यांनी माझेकडे भेटीदरम्यान पैशाची लाचमागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा स्वरुपाची तक्रार दिली असल्याने तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे दि.20/06/2024 रोजी मी स्वच्छता निरीक्षक श्री कसबे व श्री शोएब खान यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याने पोउपअधि साबळे साहेब हे शासकीय पंचासह लाचमागणी पडताळणी करणार असल्याचे सांगुन सापळा कार्यवाही प्रक्रियेची माहिती दिली.त्यांनी शासकीय पंच मिळणेबाबत शासकीय कार्यालयास पत्र दिले. त्यांनी मला संपर्कात राहण्यास सांगुन उदया दि.20/06/2024 रोजी ते शासकीय पंचांना घेवुन शासकीय

वाहनाने जालना येथे येणार असल्याचे सांगितले त्याप्रमाणे दि.20/06/2024 रोजी सकाळी 08-00 वा.पासुन मी त्यांचे संपर्कात होतो पोउपअधि साबळे व त्यांचे पथक व दोन पंच असे सकाळी 11-00वा.च्या दरम्यान जालना येथे पोहचले.त्यांनी मला जालना मोतीबाग तलाव परिसरात गोपनीय ठिकाणी बोलावुन घेतले.तेथे आल्यानंतर माझी पंच श्री मो.शफीक शहेबाज खान व मो.अब्दुल गणी यांचेशी ओळख करुन दिली त्यांना माझी लेखी तक्रार दाखविली ती पंचांनी वाचुन पाहिली व त्यावर पंचांनी समक्ष सहया केल्या.त्यानंतर मी पंच व पोउपअधि साबळे साहेब यांनी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. पोउपअधिक साबळे यांनी तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष लोकसेवक यांची लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याची प्रक्रिया थोडक्यात समजावुन सांगितली.लाचमागणी पडताळणी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांची मला माहिती देण्यात आली सदर रेकॉर्डर सुरक्षीततेच्या दृष्टीने पथकातील पोहवा/जिवडे हे हाताळणी करणार असल्याचे निश्चीत करण्यात आले. त्यावेळी मी त्यांना शोएब खान यांचे नातेवाईक मरण पावले असल्याने ते भेटण्याची शक्यता नसल्याचे सांगितले तेव्हा मी प्रथमत:श्री कसबे, स्वच्छता निरीक्षक,जालना मनपा यांची पंचासह भेट घेवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले.त्याप्रमाणे पंच क्र 1 मो.शफिक खान यांचा माझेशी पुन्हा परिचय करुन देण्यात आला व ते माझेसोबत लाचमागणी पडताळणी कारवाईकरिता येणार असल्याचे सांगितले.लोकसेवक श्री कसबे यांनी विचारणा केल्यास समयसुचकतेने उत्तरे देण्याबाबत सांगण्यात आले.मला माझे प्रलंबीत असलेल्या कामाबाबत लोकसेवक यांचेशी चर्चा करण्यास सांगण्यात आले लोकसेवक यांनी लाचमागणी केल्यास त्यास सुचकपणे उत्तरे देण्याबाबत कळविण्यात आले.मी व पंच शफीक खान असे माझे कारने श्री कसबे यांना भेटण्यासाठी साधारण दुपारी 12-45 वा.रवाना झालो जाताना श्री कसबे यांना मी फोन केला.त्यांनी मला गीता हॉटेल,शनि मंदिराजवळ,जालना येथे बोलाविले.त्याप्रमाणे पंच शफीक खान यांना अगोदरच त्या हॉटेलात बसविण्यात आले.श्री कसबे आल्यानंतर त्यांचेसोबत मी पंच बसलेल्या टेबलालगत असलेल्या टेबल खुर्ची वर बसलो.त्यांचेशी माझे महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम क.53(1) ची मला बजाविण्यात आलेली नोटीस रद्य करण्याचे संदर्भाने बोलणे झाले त्यावेळी त्यांनी पहिल्यांदा 2000 रु.दिले आहेत और 5000रु.दे दो तसेच शोएब के 5000 रु.दे दो. मी मा.आयुक्त,मनपा जालना यांचेकडुन सय्यद रहीम यांना दिलेली क 53(1) ची नोटीस नजर चुकीने बजाविण्यात आल्याचे सांगुन ती रद्य करुन आणतो असे सांगितले आहे. नोटीस रद्य करुन आणल्यानंतर पैसे देतो असे सांगुन मी व पंच असे दुपारी 01-30वा.च्या सुमारास पोउपअधि साबळे साहेब थांबल्या ठिकाणी परत आलो श्री जिवडे यांनी रेकॉर्डर माझे गळयातुन काढुन घेवुन बंद केला त्यांनी मला व पंच यांनी त्यांचेपासुन गेल्यापासुन घडलेल्या प्रकाराची हकीकत विचारली मी त्यांना श्री कसबे यांनी नोटीस रद्य करण्यासाठी त्यांचेसाठी 5000 रु. व शोएब यांचेसाठी 5000रु. लाचमागणी केली असल्याचे सांगितले पोउपअधि साबळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमधील संभाषण हेड फोन लावुन ऐकले व श्री कसबे हे नोटीस रद्य करण्यासाठी लाचमागणी करित असल्याचे सांगितले मी त्यांना म.प्रा.न.रचना अनि नोटीस रद्य करण्याबाबत विचारणा केली असता श्री कसबे यांनी "देओ ना पाच हजार रुपये !,अभी पाच हजार दे दो! पाच हजार मेरे !,वो लेंगा पाच! ,पाच मेरे कु दे दो !"अशा प्रकारचे संभाषण करुन स्वत:साठी लाचमागणी केल्याचे निष्पन्न होत असल्याचे सांगितले. त्यानंतर लगेच पोउपअधि साबळे यांनी श्री शोएब खान यांचेशी फोनवर संपर्क साधण्याबाबत मला सुचना केल्या त्याप्रमाणे मी त्यांना फोनद्वारे संपर्क करुन विचारले असता ते घरी असुन भेटण्यास तयार असल्याबाबत सांगितले त्याप्रमाणे साबळे साहेब यांनी पुन्हा लोकसेवक शोएब खान यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी प्रक्रिया पार पाडणे असल्याचे सांगुन त्याकरिता पुन्हा नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पंच क्र.1 शफीक खान हे सोबत येणार असल्याचे सांगुन पुर्वीप्रमाणे सुचना दिल्या व व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिला त्यानंतर दुपारी 02-00 वा.चे सुमारास मी व पंच श्री शफीक खान असे शोएब खान यांना भेटण्यासाठी जुना जालना येथील त्यांचे घराजवळ गेलो असता त्यांची कब्रस्तान जवळ भेट झाली त्यांचेशी पंचासमक्ष महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम क.53(1) ची मला बजाविण्यात आलेली नोटीस रद्य करण्याचे संदर्भाने बोलणे झाले .त्यावेळी त्यांनी सदर नोटीस रद्य करण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली परंतु त्यासंदर्भाने शोएब खान याने कोणतीही पैशाची मागणी केली नाही.त्यांचेशी संभाषण झाल्यानंतर आम्ही 02-45 वा.चे सुमारास पोउपअधि श्री साबळे साहेब थांबलेल्या ठिकाणी परत आलो. पोहवा/ जिवडे यांनी माझे कडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला त्यांनी मला व पंचांना झाले प्रकाराबाबत विचारणा केली असता लोकसेवक श्री शोएब खान यांनी कोणतीही लाचमागणी केली नसल्याचे सांगितले पोउपअधि साबळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमधील संभाषण ऐकुन पाहिले तक्रारदार यांनी नोटीस रद्य करण्याबाबत विचारणा केली असुन त्यांना इशाऱ्याने पैशाची विचारणा केली असता "अरे कुछ नही वो,तुम जरा चुप बैठो,वो क्या लगाये तुमने,कुछ बोलने का नही "असे सांगितले असल्याने त्यांनी पंच व माझेशी चर्चा करुन शोएबची कोणतीही

लाचमागणी नसल्याचे निष्पन्न होत असल्याने उदया दि.21/06/2024 रोजी श्री कसबे यांनी नोटीस रद्द करण्याबाबत काय कार्यवाही केली याची विचारणा करुन त्यांची भेट घेवुन लाच रक्कम देण्याची सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
दि.21/06/2024 रोजी ठरल्याप्रमाणे स.12-00 वा.चे सुमारास पोउपअधि साबळे साहेब त्यांचे पथक पंचासह सरकारी वाहनाने जालना या ठिकाणी आले माझेशी संपर्क केल्यावर मी दुपारी 01-45 वा.चे सुमारास त्या ठिकाणी गेलो श्री कसबे यांना फोन वर संपर्क केला असता त्यांनी पैसे घेवुन स्वच्छता कार्यालय,एसटी स्टँड समोर जालना येथे येण्याचा निरोप दिला तेव्हा पंचासमक्ष लोकसेवक श्री कसबे यांची भेट घेवुन लाचरक्कम 5,000 रु.देण्याची सापळा कारवाई करण्यात येणार असल्याची आम्हास माहिती देण्यात आली लाचरक्कमेसाठी माझेकडे असलेले 5,000रु.मी पोउपअधि साबळे साहेब यांना दिले सोबत असलेल्या पंच क्र.2 अब्दुल गणी यांनी त्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेतले सोबतच्या सापळा पथकाने नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन ती रक्कम माझे शर्टच्या वरील खिशात ठेवण्याकरिता दिली लोकसेवकाने मागणी करताच ती रक्कम खिशातुन काढुन आलोसे यांना देण्याचे मला सांगण्यात आले पैसे देताच कारचा हॉर्न वाजविण्याचा नियोजीत इशारा करण्याचे व इशारा होताच सोबत असणारे पथक तात्काळ त्या ठिकाणी येवुन लोकसेवकास ताब्यात घेवुन कारवाई करणार असल्याचे ठरले पुर्वीप्रमाणे माझे व श्री कसबे यांचे संभाषण रेकॉर्ड करण्याकरिता माझेकडे नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देण्यात आला पुर्वीप्रमाणे संभाषणाबाबत मला सुचना देण्यात आल्या.त्याप्रमाणे मी व पंच श्री शफीक खान असे माझे कारने दुपारी 15-10वा.चे सुमारास लोकसेवक श्री कसबे यांना भेटण्यासाठी एस.टी स्टँड,जालना समोर विठ्ठल रोड वर असलेल्या स्वच्छता कार्यालय,जालना येथे रवाना झालो जालना या ठिकाणी रवाना झालो स्वच्छता कार्यालय,जुना जालना 2 येथे कार्यालयासमोरील रोडवर कार उभी केली असता श्री कसबे हे त्यांचे कार्यालयातुन येवुन माझे कारमध्ये बसले मी त्यांना "नोटीस रिजेक्ट करके कब तक लाके देंगे"अशी विचारणा केली असता त्यांनी "सोमवार के दिन लाता "असे सांगुन हाताने लाचरक्कमेची विचारणा केली तेव्हा मी शर्टच्या वरिल खिशातील 5,000रु.ची रक्कम त्यांना दिली.(टिप-सदर सिसिटीएनएस प्रणालीमध्ये 8000 अक्षरांची क्षमता असल्याने फिर्यादीमधील पुढील मजकुर पान क्रं.2वर स्वतंत्र जोडण्यात आला आहे.)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

~~PANKAJ PANDITRAO JADHAV(I (Inspector))~~ / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): दिलीप साबळे पो.उप. अधिक्षक, ला.प्र.वि. छ. संभाजीनगर

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथ खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

21.06.2024

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
**Signature of Officer in Charg Police Station**
पोलीस ठाणे सदर बजार जालना
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PANKAJ PANDITR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पान नंबर 05 पासुन पुढे.

त्यांनी "कित्ते है "असे विचारले असता "पाच हजार,पुरे गिनलो " असे सांगितले.ती रक्कम त्यांनी मोजुन घेताच दुपारी 03-25 वा.मी नियोजीत इशारा कारचे हॉर्न वाजविला आजुबाजुच्या परिसरात दबा धरुन बसलेले पोउपअधि श्री साबळे व पथक तात्काळ त्या ठिकाणी येवुन श्री कसबे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन मी दिलेली लाचरक्कम 5000 रु.हस्तगत केली.पोहवा/ जिवडे यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला.त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,जालना येथे आरोपीस नेण्यास आले मला त्या ठिकाणी बोलावुन माझे सांगणेप्रमाणे फिर्याद घेण्यात आली सदर बाजार पोलीस स्टेशन येथे ती नोंदविण्यात येणार असल्याचे सांगितले.

तरी जालना महानगरपालीका यांनी त्यांचे हद्दीत विनापरवाना अनाधिकृत बांधकाम केल्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 क.53(1)ची नोटीस मला बजाविली होती ती नोटीस रद्य करण्याचा अहवाल पाठविण्यासाठी श्री शॅमसन छबुराव कसबे वय-49 वर्षे स्वच्छता निरीक्षक (वर्ग 3),मनपा जालना यांनी दि.20/06/2024 रोजी हॉटेल गीता,शनि मंदिर चौक,जालना येथे 5000 रु.ची स्वत:साठी व सोबतचा स्वच्छता निरीक्षक शोएब खान याचेसाठी 5000 रु.ची पंचासमक्ष लाचमागणी केली व दि.21/06/2024 रोजी दुपारी 03-25 वा.सदर लाचमागणीतील स्वत:साठी मागणी केलेली लाचेची रक्कम 5000 रु. मनपा जालना, स्वच्छता कार्यालया समोरील रोडवर विठ्ठल रोड,एस.टी.स्टँडसमोर,जालना येथे माझे कारमध्ये पंचासमक्ष स्विकारली म्हणुन श्री शॅमसन छबुराव कसबे वय-49 वर्षे स्वच्छता निरीक्षक (वर्ग 3),मनपा जालना म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे व माहितीप्रमाणे मराठीत संगणकावर टाईप केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

HC 363

पोलीस ठाणे अमलदार

पोलीस ठाणे सदर बाजार जालना

ही फिर्याद दिली

21.06.2024

सय्यद राहेम सय्यद इस्माईल